महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी- ४१३ ७२२ जि. अहमदनगर
संकेतस्थळ :- www.mpkv.mah.nic.in
ई मेल :- comptroller.mpkv@gov.in
ac२mpkv@gmail.com
दुरध्वनी क्रमांक :- (०२४२६)२४३३७४

जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/लेखा-२/ २६५ /२०२०

दिनांक ७/०४/२०२०

## परिपत्रक

**विषय :** सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये प्रशासकीय मंजूरी मिळालेले प्रस्ताव सन २०२०-२१ मध्ये पुनश्च मंजूरीस्तव सादर न करणेबाबत..
स्थायी अग्रीमांसाठी पुनश्च मंजूरी न घेणेबाबत..

अ) उपरोक्त विषयान्वये या विदयापीठातील सर्व योजना प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, सन २०२०-२१ मध्ये विदयापीठ निधीमध्ये जमा झालेल्या विविध अनुदानापैकी ज्या निधींचा विनियोग PFMS Portal व्दारे अथवा अन्य प्रकारे दिनांक ३१ मार्च,२०२० पूर्वी करणे आवश्यक होते, त्यांच्या विनियोगाचा कालावधी संपुष्टात आला आहे. त्यांपैकी अखर्चित निधी खर्च करणेस्तव अदयाप मुदतवाढ मिळालेली नाही, असे निधी वगळता अन्य निधीमधून सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये मा. कुलगूरु महोदयांनी ज्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, अशा प्रशासकीय मान्यता लेखासंहिता नियम ६.१२ नुसार सन २०२०-२१ अखेरपर्यंत खालील मंजूर प्रस्तांवांसाठी लागू राहतील:

१) मागील आर्थिक वर्षामध्ये मंजूर आर्थिक तरतूद/अंदाजपत्रकीय तरतूद/मंजूर वाषिक नियतव्यय व्यपगत झाला असून प्रस्तावित कामांसाठी निधीची तरतूद सन २०२०-२१ मध्ये अंदाजपत्रकीय मागणीव्दारे नव्याने करण्यात यावी. त्यास अधीन राहुन विदयापीठ महसूली उत्पन्न, फिरते निधी, उत्पादने चाचणी निधी यांमधील सन २०१९-२० मध्ये देण्यात आलेल्या कामांच्या प्रशासकीय मान्यता सन २०२०-२१ साठी लागू राहतील.

२) GoI Funded, ICAR, RKVY व तत्सम राज्य शासन अथवा केंद्र शासन अनुदानीत, ज्या कामांसाठी सन २०१९-२० पर्यंत प्राप्त अनुदान आवश्यकतेनूसार सन २०२०-२१ मध्ये खर्च करण्यास्तव Revalidation प्राप्त झालेले आहे.

(मागे पहा)

Scanned with CamScanner

वरील सुचना विचारात घेऊन वरील नमुद प्रस्तावांसाठी सन २०१९-२० मधील प्रशासकीय मान्यतेच्या नस्त्या पुर्नजिवीत करण्यासाठी सादर करण्यात येऊ नयेत.

ब) या पुर्वी मंजूर असलेले सर्व स्थायी अग्रीम यथास्थित कार्यरत राहतील. त्यामुळे त्यांचे पूर्वमान्यतेस्तव नवीन आर्थिक वर्षात प्रस्तावित करण्याची आवश्यकता नाही. तसेच लेखा संहिता नियम ३.६० (viii) नुसार शिल्लक अग्रीम समर्पित करण्याची आवश्यकता नसून, केवळ वर्षअखेरीस शिल्लक रक्कम कळवायची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

नियंत्रक
मफुकृवि,राहुरी.

प्रतिलीपी खालील अधिका-यांच्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. मा.संचालक, विस्तार शिक्षण/संशोधन, मफुकृवि,राहुरी.
२. मा.अधिष्ठाता (कृषि), तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी.
३. कुलसचिव/विदयापीठ अभियंता/विदयापीठ ग्रंथपाल, मफुकृवि, राहुरी.
४. सहयोगी अधिष्ठाता व सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
५. प्रकल्प अधिकारी, कृषि महाविदयालय, मुक्ताईनगर/हळगांव.
६. विदयार्थी कल्याण अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
७. सर्व विभाग प्रमुख/योजनाप्रमुख/कार्यालय प्रमुख, मफुकृवि, राहुरी.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि,राहुरी/पुणे/धुळे/कोल्हापूर.
९. सहा.नियंत्रक-१ तथा अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
१०. मा.कुलगुरु महोदय/कुलसचिव यांचे स्विय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी.

Scanned with CamScanner